**नियमीत दिवाणी दावा क्र ९८/२०२३**
**समाधान वि शासन**
**निशाणी क्र ८४**

<u>**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ - समाधान गोरख देशमुख, वय ४९ वर्ष, धंदा शेती, राहणार महाडिक वस्ती, टेंभूर्णी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर.**</u>

१. शपथेवर निवेदन करतो की, पुरावा शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला असून तो मी वाचून त्यावर माझी स्वाक्षरी केली आहे. शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे.

२. दावा मागणी समर्थनार्थ वादमिळकतीचा ७/१२ ची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे, त्यास <u>**निशाणी ८४/१**</u> लावण्यात आले. एकत्रीकरणाच्या उताऱ्याची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे, त्यास <u>**निशाणी ८४/२**</u> लावण्यात आले. तसेच दावा मिळकतीचा मुळ गट नंबर यांचे पोटहिस्से १, १अ, २अ, २ब, २क,१/अ/२/३/२/२ असे उतारे दाखल केले आहेत, सदर वरील पोटहिस्स्याचे उतारे अनुक्रमांक ५ ते १९ यांना एकत्रात <u>**निशाणी ८४/३**</u> देण्यात येते. तसेच फेरफार क्र १३९४ याची प्रमाणित नक्कल दाखल केली असून, त्यास <u>**निशाणी ८४/४**</u> लावण्यात येते. गट क्रमांक ९०३/२/ड याचा गावनमुना - ७ ची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे, त्यास <u>**निशाणी ८४/५**</u> देण्यात येते. तसेच फेरफार क्र २६३३ ची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे, त्यास <u>**निशाणी ८४/६**</u> देण्यात येते. तसेच फेरफार क्र ३०१५ ची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे, त्यास <u>**निशाणी ८४/७**</u> देण्यात येते.

३. सुमनबाई मोरे व बेबी सरडे यांच्यात दिनांक १५.०१.१९९९ रोजी झालेल्या खरेदीखताची प्रमाणित नक्कल निशाणी ४७ सोबत दाखल केली आहे. वादमिळकतच्या आजुबाजुच्या गटाची स्थिती दाखविणारा गटनकाशाची प्रमाणित नक्कल निशाणी ४७/७ सोबत दाखल केली असून, त्यास <u>**निशाणी ८४/८**</u> देण्यात येते. तसेच निशाणी ७९ सोबत प्रतिवादी क्र ६ व ७ यांच्या लाभात झालेल्या खरेदीखताच्या प्रमाणित नक्कला दाखल केल्या आहेत, त्यास यापूर्वी निशाणी ८१ व ८२ देण्यात आल्या आहेत.

पडताळणी पूर्ण.

**४.** प्रतिवादी क्र १ ते ४ व त्यांचे वकील पुकारता गैरहजर. सबब, उलटतपास काही नाही.

**५.** प्रतिवादी क्र ५ ते ८ व त्यांचे वकील पुकारता गैरहजर. सबब, उलटतपास काही नाही.

**६.** साक्षीदाराचा पुरावाविना उलटतपास कायम करण्यात आला.

वाचून दाखवले बरोबर आहे,

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.06.20 12:36:29 +0530

(आर एम कराडे)

दिनांक - २०/०६/२०२५. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.